# अभ्युदय नगर
## सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)

(नोंदणी क्रमांक : एम. यु. एम./ एम.एच.ए.डी.बी./ एच. एस.जी. / टी.सी. ) १२४९२ / सन २००६ -२००७)

कार्यालय : समाज मंदिर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.


जा. क्र. ३८/२०१७-१८

दिनांक : ०४/०८/२०१७

प्रति,
मा.अध्यक्ष/सचिव
अभ्युदयनगर ____________ सह.गृह.संस्था मर्या.
इमारत क्र. ______ , अभ्युदयनगर,
काळाचौकी, मुंबई-४०० ०३३.

**विषय : <u>अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाची सद्य:स्थिती.</u>**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आपणांस अवगत करुन देण्यात येत आहे.

अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या संघाने (मर्या.) दिनांक २९/०३/२०१७ ते ०६/०४/२०१७ या कालावधीत, समाज मंदिर हॉल येथे अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासासंबंधी इमारतीनिहाय मार्गदर्शनपर बैठका आयोजित केलेल्या होत्या. सदर बैठकास अभ्युदयनगरमधील रहिवाशांचा भरघोस पाठींबा मिळाला व सदर मार्गदर्शनपर बैठकीत अभ्युदयनगरच्या रहिवाशांनी/संस्थांनी ज्या सूचना मांडलेल्या होत्या, त्या सूचना अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता निवडलेला, विकासक **मे.किस्टोन रिॲल्टर्स प्रा.लि.**, तसेच **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री.निखिल दिक्षीत** यांचेकडे लेखी स्वरुपात पाठविलेल्या होत्या.

सदर सूचनांची परिपूर्तता करण्याकरिता संघाने आजतागायत त्याचा पाठपुरावा केलेला आहे. त्याकरिता संघाने सातत्याने विकासक, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व आवश्यकता भासेल तेथे विभागीय **आमदार मा.श्री.अजय चौधरी साहेब** यांचे समवेत बैठका आयोजित केलेल्या होत्या.

आपल्याच सूचनेनुसार अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाच्या कामाकरिता सॉलिसीटर फर्मची नेमणूक करण्याकरिता दिनांक २६/०४/२०१७ रोजी स्थानिक मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रात जाहिरात दिलेली होती. सदर जाहिरातीस प्रतिसाद म्हणून मुंबईतील पाच नामांकित सॉलिसीटर फर्मची माहिती संघाकडे प्राप्त झालेली होती त्यांची नांवे पुढीलप्रमाणे.

... २

(१) मे.दिव्या शहा असोएिसटस्
(२) मे.सोलोमन ॲन्ड कंपनी
(३) मे.हेमंत सहाई असोसिएटस्
(४) मे.ताम्हाणे ॲन्ड कंपनी
(५) मे.सॉलिसिस् लेक्स्

प्राप्त झालेल्या माहितीनुसार संघाने पाचही सॉलिसीटर समवेत त्यांचे कार्यालयात जाऊन भेटी घेतल्या व सदर सॉलिसीटर फर्मला पुनर्विकासाबाबतचा पूर्व अनुभव, काम करण्याची क्षमता, मनुष्यबळ व आकारली जाणारी फी या संदर्भात माहिती घेतली.

सदर माहितीच्या आधारे अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता योग्य सॉलिसीटर फर्म म्हणून **मे.दिव्या शहा असोसिएट** यांची संघाने एकमताने निवड केलेली आहे. **मे.दिव्या शहा ॲन्ड असोसिएट** या कंपनीस अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता विकासकरारनामा ते नविन इमारतींचे अभिहस्तांतरण पर्यंतच्या सर्व कामाची जबाबदारी त्यांच्या नेमणुकीच्या पत्रामध्ये नमुद केलेली आहे. त्यानुसार विकासकरारनाम्याचे कामकाज सुरु झालेले आहे. विकासकरारनामाचा प्रारुप मसुदा संघास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाहीची रुपरेषा आपणांस कळविण्यात येईल.

धन्यवाद !

आपले विश्वासू,

**( नंदकुमार काटकर )**
अध्यक्ष

नोंदणी क्र. एमयुएस/एमएच/एडीबी / एचएमजी / टी.सी) १२४९२ / सन २००६-०७
मुंबई-३३.

**( जयसिंग भोसले )**
सरचिटणीस

(१) मे.दिव्या शहा असोएिसटस्
(२) मे.सोलोमन ॲन्ड कंपनी
(३) मे.हेमंत सहाई असोसिएटस्
(४) मे.ताम्हाणे ॲन्ड कंपनी
(५) मे.सॉलिसिस् लेक्स्

प्राप्त झालेल्या माहितीनुसार संघाने पाचही सॉलिसीटर समवेत त्यांचे कार्यालयात जाऊन भेटी घेतल्या व सदर सॉलिसीटर फर्मला पुनर्विकासाबाबतचा पूर्व अनुभव, काम करण्याची क्षमता, मनुष्यबळ व आकारली जाणारी फी या संदर्भात माहिती घेतली.

सदर माहितीच्या आधारे अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता योग्य सॉलिसीटर फर्म म्हणून **मे.दिव्या शहा असोसिएट** यांची संघाने एकमताने निवड केलेली आहे. **मे.दिव्या शहा ॲन्ड असोसिएट** या कंपनीस अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता विकासकरारनामा ते नविन इमारतींचे अभिहस्तांतरण पर्यंतच्या सर्व कामाची जबाबदारी त्यांच्या नेमणुकीच्या पत्रामध्ये नमुद केलेली आहे. त्यानुसार विकासकरारनाम्याचे कामकाज सुरु झालेले आहे. विकासकरारनामाचा प्रारुप मसुदा संघास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाहीची रुपरेषा आपणांस कळविण्यात येईल.

धन्यवाद !

आपले विश्वासू,

**( नंदकुमार काटकर )**
अध्यक्ष

अभ्युदय नगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
नोंदणी क्र.
एमयुएस/एमएच/
एडीबी / एचएसजी /
टी.सी) १२४९२ /
सन २००६-०७
मुंबई-३३.

**( जयसिंग भोसले )**
सरचिटणीस